मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 13 जून 2024 | पान- 1

# पावसाळापूर्व कामांसाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना 'अल्टिमेटम'

## आठ दिवसांत कामे मार्गी लावण्याची अधिकाऱ्यांना सूचना : भोसरीत भाजपा आमदार महेश लांडगे यांची आढावा बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघातील पावसाळी पूर्व कामे आगामी ८ दिवसांत मार्गी लावा. रस्ते खोदाई नियमावलीची कठोर अंमलजावणी करावी आणि नागरी आरोग्याच्या दृष्टीने साथीचे रोग प्रतिबंधक औषध फवारणी करावी, अशा सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिल्या आहेत.



पिंपरी-चिंचवड महापालिका फ-क्षेत्रीय कार्यालयात पावसाळा पूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी स्थापत्य विभागाचे मुख्य शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह फ-क्षेत्रीय अधिकारी सिताराम बहुरे, स्थापत्य, आरोग्य, उद्यान, वैद्यकीय आदी विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

भोसरी मतदार संघातील चिखली गावठाण, पाटीलनगर, मोरेवस्ती, घरकुल, कृष्णानगर, यमुनानगर, त्रिवेणीनगर, तळवडे गावठाण, रुपीनगर, सहयोगनगर, शिवतेजनगर आदी परिसरातील पावसाळा पूर्व कामे आणि प्रलंबित विकासकामे याबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी सर्व माजी नगरसेवक, सर्वपक्षीय पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

> पावसाळा पूर्व कामे पूर्ण करावीत आणि सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या वाहतूक समस्या, पूरपरिस्थितीत मदतकार्य आणि नागरी आरोग्याच्या तक्रारींबाबत महापालिका प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करावी. अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचले होते. त्यामुळे नालेसफाई, पावसाळी पाणी निचरा व्यवस्था आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. नागरिकांना सक्षमपणे पायाभूत सोयी-सुविधा देण्यासाठी प्रशासनाने कार्यक्षमपणे काम करावे, अशा सूचना केल्या आहेत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

नालेसफाई, पावसाळी पाणी निचरा व्यवस्था, रस्ते खोदाई नियमावलीची अंमलबजावणी, वृक्ष छाटणी, धोकायदायक वृक्ष हटवणे यासह आपत्ती व्यवस्थापन आदी विविध मुद्यांवर या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. आगामी ८ दिवसांत रस्त्यांच्या दुरूस्तीची कामे पूर्ण करावीत, तसेच पथदिवे आणि साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी औषध फवारणी करावी, असे आदेश प्रशासनाला दिले आहेत. यावेळी प्रभागातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही प्रशासनाला सूचना आमदार महेश लांडगे यांनी केल्या आहेत.

# महामेट्रोवर कृपादृष्टी, महापालिकेच्या जागेवर वक्रदृष्टी!

## महापालिकेने दहा जागा मेट्रोला मालकी हक्काने आणि बिनशर्त द्याव्यात : राज्य शासना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने पुणे महामेट्रोसाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने जागा हस्तांतरित केल्या. शहरातील अतिशय मोक्याच्या दहा ठिकाणच्या जागांवर राज्य शासनाची वक्रदृष्टी पडली आहे. मेट्रोची स्थिरता आणि वित्तीय व्यवहार्यता वाढविण्याच्या दृष्टीने आणि तिकिटेतर उत्पन्न वाढविण्यासाठी महापालिकेने दिलेल्या जागांचा वापर वाणिज्यिक करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने या जागा मेट्रोला मालकी हक्काने आणि बिनशर्त द्याव्यात, अशी सूचना राज्य शासनाने पिंपरी-चिंचवड महापालिकेला केली आहे. दरम्यान, जागा देण्यास महापालिकेचा विरोध असून यावरून दोन्ही संस्थांमधील वाद वाढू शकतो.

पिंपरी-चिंचवड शहरात दापोडी ते पिंपरी या ७.५ किलोमीटर अंतरावर मेट्रो धावत आहे. या मेट्रोच्या कामासाठी महापालिकेने २८७ कोटी ७० लाख रुपयांचा हिस्सा महामेट्रोला दिला आहे. आता निगडीपर्यंतच्या मेट्रोच्या कामाला सुरुवात झाली आहे. महापालिकेने २०१८ मध्ये मेट्रोच्या प्रवाशांच्या वाहनांसाठी वाहनतळासह इतर कामांसाठी शहरातील महत्त्वाच्या दहा ठिकाणच्या जागा ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने दिल्या आहेत. मात्र, आता महापालिकेच्या या जागांवर महामेट्रो आणि राज्य शासनाची वक्रदृष्टी पडली आहे. मेट्रो प्रकल्प वित्तीयदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे.



त्यासाठी मेट्रोला दिलेल्या जागांचा वापर वाणिज्य विकासासाठी करून त्या माध्यमातून निधी उभारणे अत्यावश्यक असल्याचे शासनाचे म्हणणे आहे. मात्र, महापालिकेने ३० वर्षांसाठी जागा दिल्याने त्याचा वाणिज्य वापर करण्यास अडचणी येत आहेत. याचाच विचार करून राज्य शासनाने आता महामेट्रोची स्थिरता आणि वित्तीय व्यवहार्यता वाढविण्याच्या दृष्टीने तिकिटेतर उत्पन्न वाढविण्यासाठी स्वतः मेट्रोला मदत न करता महापालिकेच्या जागा मेट्रोला बिनशर्त वाणिज्य वापराला कायमस्वरूपी देण्याचा घाट घातला आहे. मेट्रोला दहा ठिकाणच्या मोक्याच्या जागा देण्याच्या सूचना राज्य शासनाच्या नगरविकास खात्याच्या उपसचिव विद्या हम्पय्या यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना दिल्या आहेत.

### या जागांची मागणी

» महापालिका भवनासमोरील वाहनतळ आरक्षण क्रमांक ११५, वल्लभनगर एसटी डेपो आरक्षण ११२, फुगेवाडी जकात नाक्याची जागा, महापालिका कार्यालयासमोरील, प्रवेशद्वारालगतची, दापोडीतील सुविधा भूखंड, फुगेवाडीतील लोकमान्य टिळक आणि मिनाताई बाळासाहेब ठाकरे प्राथमिक शाळेची जागा, महापालिकेसमोरील एका हॉटेलच्या पाठीमागील सुविधा भूखंड, महापालिका आवारातील आणि वल्लभनगर येथील या महत्त्वाच्या दहा ठिकाणच्या मोकळ्या जागा मेट्रोला हव्या आहेत.

महापालिकेकडून भाडेपट्ट्याने घेतलेल्या जागांचा वाणिज्यिक वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी या जागा देण्याबाबत शासनाकडे परवानगी मागितली होती. त्याची परवानगी मिळाली आहे, असे पुणे महामेट्रोचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत सोनवणे यांनी केले. तर, महापालिकेच्या भूमी आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे म्हणाले, की मेट्रोला भाडे तत्त्वाने जागा दिल्या आहेत. मालकी हक्काने देणे योग्य नाही. याबाबतचा अभिप्राय शासनाला पाठविण्यात येणार आहे.

# पुणे पोलीस आयुक्तालय होणार कॉर्पोरेट!

## पावसाळी अधिवेशनाच्या आधी होणार प्रकल्पाच्या 11 डिझाईन्सचे सादरीकरण : 193 कोटींच्या खर्चाला यापूर्वीच प्रशासकीय मान्यता

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोलीस आयुक्तालयाच्या सध्याच्या जागेवरच नव्याने अत्याधुनिक स्वरूपाची आणि आधुनिक सोई-सुविधा असलेल्या 'टी' आकाराची भव्य इमारत उभी केली जाणार आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या धर्तीवर पोलीस आयुक्तालयाची 'ग्रीन बिल्डिंग' उभारली जाणार आहे.

या कामासाठी गृह विभागाने १९३ कोटी ८० लाख ५९ हजार रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता यापूर्वीच दिली आहे. या इमारतीसाठी विविध आर्किटेक्टकडून ११ डिझाईन तयार करण्यात आली आहेत. या डिझाईन आणि प्रकल्पाचे पावसाळी अधिवेशाच्या आधी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासमोर सादरीकरण केले जाणार आहे. पावसाळी अधिवेशनात सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात या कामाला निधी मिळण्याची शक्यता असून निविदा प्रकिया राबविली जाणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वर्तवली. सध्याची आणि येत्या ५० वर्षांची आवश्यकता विचारात घेऊन इमारत उभारली जाणार आहे.



मागील काही वर्षात शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. पिंपरी-चिंचवड शहरदेखील पुणे पोलीस आयुक्तालयातच होते. मात्र, काही वर्षांपूर्वी शासनाने पिंपरी चिंचवडकरिता वेगळ्या पोलीस आयुक्तालयाची निर्मिती केली. दरम्यान, पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ग्रामीण पोलीस दलातील काही पोलीस ठाण्यांचा समावेश करण्यात आला. शहराचा वाढता विस्तार, वाढती लोकसंख्या पाहता पोलिसांवर कामाचा ताणदेखील वाढत आहे. कामाचा व्याप वाढल्याने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेली पोलीस आयुक्तालयाची इमारत अपुरी पडू लागली आहे. त्यामुळे विस्तारित आणि आधुनिक सोईसुविधांनीयुक्त इमारतीची आवश्यकता भासू लागली आहे. काही वर्षांपूर्वी शासनाने पोलीस आयुक्तालयाच्या जागेचा खटला देखील जिंकलेला आहे. त्यामुळे ही जागा आता पूर्णपणे आयुक्तालयाच्या ताब्यात आहे. हा भूखंड गृह विभाग, महाराष्ट्र शासनाच्या नावावर आहे.

याबाबत माहिती देताना अतिरिक्त पोलीस आयुक्त अरविंद चावरिया म्हणाले, आयुक्तालयाच्या सध्याच्या जागेवर टप्प्याटप्प्याने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या धर्तीवर पोलीस आयुक्तालय उभारण्यात येणार आहे. अत्याधुनिक इमारतीचे नियोजन करण्यात आले असून या ठिकाणी सर्व अतिवरिष्ठ, वरिष्ठ, कनिष्ठ अधिकाऱ्यांचे कक्ष असणार आहेत. यासोबतच गुन्हे शाखा, विशेष शाखा, वाहतूक शाखा, परकीय नागरिक नोंदणी, प्रशासन, मुख्यालय आदी शाखांची कार्यालये, यासोबतच भरोसा सेल, नागरिक सुविधा केंद्र, अपंगांसाठी सुविधादेखील उभारल्या जाणार आहेत. पोलीस आयुक्तालयात तक्रारी आणि विविध कामांच्या अनुषंगाने येणाऱ्या नागरिकांसाठी 'वेटिंग लाऊंज', पोलीस अधिकारी, कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी व्यायामशाळा (जीम), ऑडिटोरियम, सोलार सिस्टीम, मैलापाणी शुद्धीकरण केंद्रदेखील बांधण्यात येणार आहे. साधारणपणे तळ मजला अधिक पाच मजले, अशी ही इमारत असणार आहे. तेवढेच प्रशस्त वाहनतळदेखील येथे बांधण्यात येणार आहे.

आयुक्तालयाच्या नवीन इमारत बांधकाम परवानगी, निधीची उपलब्धता यासाठी प्रशासन विभागाकडून पाठपुरावा केला जात होता. पुणे पोलिसांनी हा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाला पाठवला होता. महासंचालक कार्यालयाकडून हा प्रस्ताव गृहमंत्रालयाला सादर करण्यात आला. तब्बल २४२ कोटी ९९ लाख ९१ हजार ११५ रुपयांचा खर्च या प्रकल्पासाठी अपेक्षित असल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आले होते. हे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आले होते. त्याचा विचार करून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने १९३ कोटी ८० लाख ५९ हजार रुपयांच्या निधीस मंजुरी दिली होती. कामाच्या निविदा मागविण्याचा आधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू करण्यात येऊ नये, अशी अट आहे. त्यामुळे पावसाळी अधिवेशनात निधी मिळण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

### पावसाळी अधिवेशनात निधी मिळताच निविदा प्रक्रिया

» **विधानसभेचे पावसाळी अधिवेशन १० जूनपासून सुरू होणार होते. आता हे अधिवेशन २७ जूनपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही मुदत वाढवण्यात आली. मंत्रिमंडळाची शिफारस राज्यपालांकडे पाठवण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अखेरीस अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला, तेव्हा १० जूनपासून पावसाळी अधिवेशन सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता केंद्रीय अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी संसदेच्या अधिवेशनानंतर हे अधिवेशन घेण्यात येणार आहे. या अर्थसंकल्पात पुणे पोलीस आयुक्तालयाला निधी मिळण्याची दाट शक्यता असून त्यानंतर निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे.**

# नशेसाठी मोबाइल चोरुन केला ज्येष्ठाचा खून

## नशेसाठी ज्येष्ठ नागरिकाचा मोबाइल संच चोरुन खून करणाऱ्या तिघांना पोलिसांकडून अटक

**पुणे | प्रतिनिधी**

नशेसाठी ज्येष्ठ नागरिकाचा मोबाइल संच चोरून खून करणाऱ्या तिघांना ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने गजाआड केले. याप्रकरणात चार अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे. विलास बाबा वाघ (वय २०), प्रकाश बाबा वाघ (वय १९), भीमा गणेश हिलम (वय २५, तिघे रा. कन्या शाळेजवळ, ओतूर ता. जुन्नर, जि. पुणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. नवाब अहमद शेख (वय ७२ वर्षे सध्या रा. ओतूर)असे खून झालेल्या जेष्ठ नागरिकाचे नाव आहे. नबाब शेख ओतूरमधील कांदा बाजारात मजुरी करायचे.

शनिवारी (८ जून) शेख ओतूर कांदा बाजारात मृतावस्थेत सापडले. पोलिसांनी त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. तेव्हा त्यांचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे उघडकीस आले. त्यानंतर शेख यांचा मुलगा शादाब (वय ४२, रा. निमोण तास, ता. संगमनेर, जि. अहमदनगर) यांनी याबाबत ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.




या घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने तपास सुरू केला. ओतूर बाजार आवारातील सीसीटीव्ही चित्रीकरण पोलिसांनी तपासले. शेख यांचा खून होण्यापूर्वी बाजार आवराात संशयास्पद फिरत असल्याचे चित्रीकरणात दिसून आले. पोलिसांनी तपास करून आरोपी वाघ, हिलम यांच्यासह चार अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. नशा करण्यासाठी त्यांनी शेख यांचा मोबाइल चोरण्याचा प्रयत्न केला. शेख यांनी विरोध केल्यानंतर त्यांचा गळा आवळून खून केल्याची कबुली आरोपींनी दिली.

पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त पोलीसअधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी रविंद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, सहायक निरीक्षक लहू थाटे, उपनिरीक्षक अजित पाटील, दीपक साबळे, राजू मोमीन, अतुल डेरे, संदीप वारे, अक्षय नवले, अक्षय सुपे, महेश पठारे, देविदास खेडकर, ज्योतीराम पवार, बाळशिराम भवारी, नदीम तडवी यांनी ही कामगिरी केली.

# विकासकामांचा अंदाजपत्रकात समावेश नाही

## आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले: एकूण अंदाजपत्रकाच्या किमान 25 टक्के तरतूद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करताना भांडवली विभागांकडून अंदाजपत्रकामध्ये नवीन विकास कामे अथवा मोठ्या प्रकल्पांचा समावेश करताना नाममात्र (टोकन) तरतुदी ठेवल्याचे निदर्शनास आले होते. अशा विकासकामांचा अंदाजपत्रकात समावेश करण्यात येणार नसल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले आहे. एकूण अंदाजपत्रकाच्या किमान २५ टक्के तरतूद ठेवा, अशा सूचना संबंधित विभागांना आयुक्तांनी दिलेल्या आहेत.

नवीन विकासकामे अथवा मोठ्या प्रकल्पांना नाममात्र तरतूद ठेवल्यामुळे महापालिकेच्या आर्थिक दायीत्वामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या आर्थिक नियोजन, आर्थिक औचित्य व आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने नवीन विकास कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या तुलनेत तसेच कामाचा कालावधी गृहीत धरून त्या प्रमाणात पुरेशी तरतूद करणे आवश्यक असल्याचे आयुक्तांनी सुचविले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सध्याचे पत मूल्यांकन 'एए प्लस' आहे.

महापालिकेला भविष्यामध्ये कर्जरोखे उभारण्याची आवश्यकता वाटल्यास चांगले पत मूल्यांकन राखणे अत्यंत आवश्यक आहे. महापालिकेच्या दायीत्वामध्ये वाढ झाल्यास अथवा आर्थिक स्थिती आटोक्यात न राहिल्यास पत मूल्यांकन घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे वित्तीय उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये नवीन विकासकामे किंवा प्रकल्पांचा समावेश करताना अंदाजपत्रकीय रकमेच्या किमान २५ टक्के तरतूद ठेवणे अपेक्षित आहे. अथवा कामाचा कालावधी गृहीत धरून त्या प्रमाणात टक्केवारीची विभागणी करून ज्या त्या वित्तीय वर्षात तरतूद ठेवण्याची दक्षता घ्यावी, असे आदेश आयुक्तांनी परिपत्रकाद्वारे दिले आहेत. सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.



### आवश्यक माहिती बैठकीपूर्वी प्राप्त होत नाही

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध भांडवली विभागांमार्फत विकास कामांच्या निविदा प्रसिध्द केल्या जातात. या निविदांचे दर उघडल्यानंतर निविदा मंजुरीचे विषय निविदा समितीपुढे सादर केले जातात. त्यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार निविदा समितीदेखील गठीत करण्यात आलेली आहे. निविदा समितीची नियमित बैठक आयोजित केली जाते. या बैठकीदरम्यान निविदा समिती सदस्य विविध विकासकामांवर विषयावर चर्चा करतात. मात्र या सदस्यांपुढे सादर केले जाणारे विषय व अनुषंगिक आवश्यक असलेली माहिती बैठकीपूर्वी प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

### विकासकामांचे प्रस्ताव दोन दिवस आधी द्यावेत

» विषयपत्रिका प्राप्त न झाल्याने निविदा समितीमधील सदस्यांना विकासकामांबाबत चर्चा करता येत नाही. त्यामुळे या सदस्यांपुढे विषयांची माहिती दोन दिवस आधी कार्यालयीन वेळेत द्या, असे आदेश पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत. सर्व विभागप्रमुखांना हे आदेश दिले असून संबंधित कर्मचाऱ्यांच्या देखील निदर्शनास आणून द्या, अशा सूचना आयुक्तांनी दिलेल्या आहेत.

# डेअरी फार्म उड्डाणपूल नऊ महिन्यांत पूर्ण होणार

## इंदिरा गांधी उड्डाणपूल धोकादायक रेल्वे प्रशासनाकडून महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागास पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरीतील इंदिरा गांधी उड्डाणपूल धोकादायक बनला होता. त्यामुळे त्या उड्डाणपुलावरून अवजड वाहतुकीसह अन्य वाहतूक बंद करा म्हणून रेल्वे प्रशासनाकडून महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागास पत्र आले आहे. त्यामुळे पिंपरी डेअरी फार्म येथील उड्डाणपुलाचे काम ९ महिन्यांत पूर्ण करावे लागणार आहे. २५ मार्च २०२५ रोजी निर्धारित मुदतीत काम पूर्ण केले जाईल, अशी माहिती महापालिकेकडून देण्यात आली.

पिंपरी गावातून पुणे-मुंबई महामार्गावर प्रवेश करण्यासाठी पिंपरी डेअरी फार्म रस्त्याचा उपयोग केला जातो. पिंपरी डेअरी फार्म येथे लोहमार्ग असल्याने रेल्वेचा सिग्नल दिल्यानंतर वाहनांना दहा ते पंधरा मिनिटे वाट पाहावी लागते. नोकरी, व्यवसाय तसेच इतर महत्त्वाच्या कामासाठी जाणाऱ्या नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड महापालिकेने डेअरी फार्म येथील लोहमार्गावर उड्डाणपूल बांधण्यास सुरुवात केली आहे. या कामाला वर्षभराची मुदत देण्यात आली आहे. २५ मार्च २०२५ रोजी ही मुदत संपुष्टात येते. सध्या पुलाचे खांब बांधण्यात आले आहेत. रेल्वे पटरीवरील काम हाती घेण्यात आले आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी नऊ महिन्यांचा अवधी अपेक्षित आहे. त्यानंतर हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला होणार आहे.

या ठिकाणी पूल बांधण्याची पिंपरी-चिंचवडकरांची गेल्या कित्येक वर्षांपासूनची मागणी होती. उड्डाण पूल नसल्यामुळे लोहमार्ग फाटकासमोर दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी होत होती. परिणामी अपघात देखील घडले आहेत. याचा विचार करून महापालिकेने या ठिकाणी उड्डाणपूल बांधण्यास सुरुवात केली. त्यासाठी हा रस्ता गेल्या चार महिन्यांपासून बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी, पिंपरी गावातील नागरिकांना पिंपरी कॅम्पमधून साई चौकातील बोगद्यातून किंवा लिंकरोडमार्गे उड्डाणपुलावरून मोरवाडी येथे बाहेर पडावे लागते. त्यामुळे लवकरात लवकर पुलाचे काम मार्गी लावून हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.




> “ रेल्वे हद्दीतील उड्डाणपुलाच्या कामासाठी रेल्वे खात्याची परवानगी अपेक्षित आहे. या ठिकाणी करण्यात येणाऱ्या कामांसाठी लष्कराकडून परवानगी मिळालेल्या आहेत. रेल्वे खात्याची परवानगी मिळाताच पुलाचे काम लवकर मार्गी लावण्यात येईल.
> - प्रेरणा सिनकर, कार्यकारी अभियंता

### रेल्वे खात्याची परवानगी हवी

» रेल्वे उड्डाणपुलाची लांबी १ हजार २९० मीटर इतकी आहे. तर, रुंदी १७.२० मीटर इतकी आहे. या कामासाठी ६५.२८ कोटी रुपयांचा खर्च केला जात आहे. हे काम ३१ मार्च २०२३ रोजी सुरू झाले. आतापर्यंत ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत कामासाठी मुदत दिलेली आहे, अशी माहिती संबंधित विभागाकडून देण्यात आली आहे..

# पंतप्रधान मोदींचीसुद्धा घेणार मदत : शरद पवार

## बारामतीसह पुरंदरच्या औद्योगिक विकासासाठी माझा प्लॅन तयार, सहकार्याची अपेक्षा व्यक्त

पुणे | प्रतिनिधी

बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर साठी माझा प्लॅन तयार असून या भागात मोठ्या प्रमाणात उद्योग आणणार आहे. त्यासाठी पंतप्रधान मोदींची देखील मदत घेणार असल्याचे शरद पवारांनी स्पष्ट केले. लोकसभेच्या निवडणुकीनंतर बारामती येथे आयोजित व्यापारी मेळाव्यात पहिल्यांदा मार्गदर्शन करताना पवार बोलत होते. ते म्हणाले यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना पुण्यामध्ये एमआयडीसी आली.

त्यानंतर मी जेजुरी, बारामती, इंदापूर ,भिगवण चाकण ,शिरवळ येथे एमआयडीसीचे जाळे पसरले. त्यानंतर हे तालुके व्यापाराचे केंद्र बनले. कारखानदारीमुळे व्यापार व्यवसाय वाढला. बारामती पूर्वी गुळाच्या व्यापारसाठी प्रसिद्ध होती. सध्या चित्र बदलले आहे. व्यवसायाची नवीन केंद्र उभा राहिली आहेत. येणाऱ्या काळात देखी ल उद्योग उभारणी होणार आहे.

मोदींनी माझ्यावर वैयक्तिक टीका केली मात्र ते मी विचारात घेत नाही. बारामती परिसराची औद्योगिक स्थिती सुधारण्यासाठी केंद्र व राज्य सरकारची मदत घ्यावी लागेल त्यामुळे बारामतीकरांची संपत्तीक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे. त्यासाठी एका विचाराने राहुल अर्थकरण कसे मजबूत होईल याकडे सर्वांनी लक्ष देणे गरजेचे असल्याचे पवारांनी स्पष्ट केले.

त्यांनी यावेळी बारामतीकरांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. बोलताना त्यांनी हिंजवडी आयटी पार्क कसा उभा राहिला हे सांगितले. ११ हजार कोटींचा तो प्रोजेक्ट आहे. तीन लाख लोकांना तिथे काम मिळाले आहे. त्यावेळी सरकारने घेतलेल्या ठोस निर्णयामुळे हे घडल्याचेही त्यांनी सांगितले.

राम मंदिराच्या नावाने मते मागितली मात्र त्यांचा अयोध्येत देखील पराभव झाला. उत्तर प्रदेशने वेगळा निकाल दिला. २४० जागांवर समाधान मानावे लागले. चंद्राबाबू व नितेश कुमार यांचा पाठिंबा घ्यावा लागला. त्यांच्यासोबत केलेल्या सामंजस्याचे विस्मरण करून मोदींना चालणार नाही अशी टीका शरद पवार यांनी केली. महाराष्ट्रात ४८पैकी ३० जागा निवडून आणल्या लोकांच्या भल्यासाठी त्याचा उपयोग करावा लागेल असे पवार म्हणाले.

यावेळी विठ्ठलशेठ मणियार, मदन बाफना, सदाशिव सातव, जवहार वाघोलीकर, युगेंद्र पवार, शहराध्यक्ष संदीप गुजर, तालुकाध्यक्ष एस .एन .जगताप, पौर्णिमा तावरे,सुशीलकुमार सोमानी, सुधीर पाटसकर, सुनील सस्ते, शहर युवकअध्यक्ष सत्यव्रत काळे, नरेंद्र गुजराती, संभाजी किरवे, निलेश भिंगे, महावीर शहा, जगदीश पंजाबी, वनिता बनकर तसेच बारामती शहरातील व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार निलेश निंबळककर यांनी मानले.



### बारामतीकरांनी शहाणपणा दाखवला

» बारामतीकर शहाणे लोक आहेत. त्यांनी शहाणपणा दाखवला. १ हजार२५० बुथवर निवडणूक झाली. त्यापैकी १ हजार १९० बुथवर आम्हाला आघाडी मिळाली. १९६७ पासून पाहतोय बारामतीकर शहाणपणाने वागत आहेत. शहाणपणापासून ते कधीही दूर गेले नाहीत. त्यामुळे बारामतीकरांची दखल न्यूयॉर्क मधील वृत्तपत्रने देखील घेतली.

### मोदींना जमिनीवर आणले

» सामूहिक शहाणपणामुळे लोकशाही टिकली आहे. दहा वर्षे सत्तेत राहिलेल्यांना देखील यंदाच्या लोकसभा निवडणुकीत लोकांनी जमिनीवर आणले असल्याची टीका शरद पवार यांनी मोदी यांच्यावर केली. निवडणुका येतात जातात देशाला स्थिरतेची आवश्यकता आहे. मजबूत अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

# दमदार पावसाने शेतकऱ्याच्या आशा पल्लवित

## कडक उन्हाळ्यामुळे पाण्यासाठी बळीराजा जीवाचं रान, पावसाने हजेरी लावण्याने दिलासा

पुणे | प्रतिनिधी

पळसदेव तालुका इंदापूर भागात सलग चार-पाच दिवस पावसाने हजेरी लावण्याने बळीराजाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. कडक उन्हाळ्यामुळे पाण्यासाठी बळीराजा जीवाचं रान करत होता. लाखो रूपये खर्च करून शेतकरी शेतापर्यंत पाणी पोहचवण्याचा प्रयत्न करत होता.

पाण्याअभावी पिके जाळून जाण्याच्या मार्गावर होती. अनेकांनी पिके आता जगातील अशी असाच सोडून दिली होती. उजनी धरणातील पाणी पातळी एकदमच कमी झाल्याने उजनीतून पाणी उचलून पिकांना देणे मोठं जिकीरीचं झालं होत. मात्र, ऐन संकटात पावसाने हजेरी लावण्याने बळीराजाला दिलासा मिळाला आहे.

पळसदेव तालुका इंदापूर भागात गेल्या पाच दिवसांपासून कमी अधिक प्रमाणात पाऊस झाला असल्याने बळीराजा एकदम सुखावला आहे. गेल्या पाच दिवसांतून दमदार पाऊस झाल्याने सगळी शेत पाण्याने फुल्ल होऊन गेली आहेत. गेली दोन दिवस पळसदेव भागात संतधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे जमिनीतील पाणी पातळी देखील वाढ होण्यास मदत होत आहे. जिरायती पट्ट्यात गेली अनेक वर्षांपासून परतीच्या पावसाची जोरदार हजेरी लावली. त्यामुळे मे महिन्यातील अवकाळी पाऊस, मॉन्सूनपूर्व पाऊस व मॉन्सून यावर खरिपातील पिकांचे गणित अवंलबून असते.

गेली अनेक दिवस शेतकरी व नागरिकांना पाण्यासाठी दही दिशा फिरण्याची वेळ आली होती. उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. अगदी उजनी काठावरील अनेक गावात टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ आली होती . या पावसाने नागरिक व बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.



### अजून दमदार पावसाची गरज

» खरीप हंगामात बाजरी, मका, कांदा, कडधान्ये पिके, चारा पिके, असे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. पाण्याच्या टंचाईचा प्रश्न कमी होण्यासाठी अजून दमदार पावसाची गरज आहे. मुर पाऊस झाला असून अजून पाणीसाठे झाले नसले तरी पावसाची सुरुवात चांगली झाली असल्याचे मत शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

### तालुक्यातील पावसाची आकडेवारी

» बारामती - १०९ मिलिमीटर (२४८), माळेगाव बुद्रुक - ६१ मिलिमीटर (११७), पणदरे- ४८ मिलिमीटर (९०), वडगाव निंबाळकर - ६४ मिलिमीटर (११५), लोणीभापकर ४० मिलिमीटर (१२५), मोरगाव -४७ मिलिमीटर (१४५), सुपा-२७ मिलिमीटर (५८), उंडवडी क.प.- ५० मिलिमीटर (६२). तालुक्यात आतापर्यंत सरासरी १२० मिलिमीटर पाऊस झाला, अशी माहिती बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे यांनी दिली.